# प्रेसनोट दि.०७/०४/२०१९

## बिबवेवाडी पोलीस ठाणे पुणे शहर

## रेकॉर्डवरील गुन्हेगार दोन वर्षाकरीता तडीपार

बिबवेवाडी पोलीस ठाणेचे रेकॉर्डवरील गुन्हेगार सनी संतोष भरगुडे,वय २० वर्षे,रा.निलेश कॉम्प्लेक्स बिबवेवाडी गावठाण पुणे. याचेवर बिबवेवाडी ठाणेस शरीराविरुध्द व मालाविरुध्द गुन्हे असुन तो त्याचे गुन्हेगारी प्रवृतीचे गुंड मित्रांसह राहत असलेल्या परिसरातील नागरिकांना अडवुन त्यांना मारहाण व शिवीगाळ करून त्यांना दमदाटी करत असतो. वेळप्रसंगी हत्याराचा धाक दाखवुन जिवे ठार मारण्याची धमकी देवुन,त्यांचेकडील पैसा अडका लुटने, खंडणी मागने, घरात घुसुन धमकी देणे अश्या प्रकारचे गंभिर गुन्हे करुन जनमानसात दहशत पसरवणे यांसारखे गुन्हे दाखल असल्याने त्याचा महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ५६ प्रमाणे तडीपार प्रस्ताव मा. पोलीस उप आयुक्त साो.परिमंडळ -५ पुणे शहर यांचेकडे सादर केला होता. त्यानुसार मा. पोलीस उप आयुक्त साो.परिमंडळ -५ पुणे शहर यांनी नमुद आरोपीस त्यांचे कार्यालयीन आदेश क्र.०५/२०१९ दि.०५/०४/२०१९ अन्वये कलम ५६(१)(अ)(ब) प्रमाणे पुणे पोलीस आयुक्तालय व पिंपरी चिंचवड आयुक्तालय व पुणे जिल्हा हद्दीतुन ०२ वर्षाकरीता तडीपार करणेत आलेले आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस उप आयुक्त साो,परि-०५ पुणे शहर श्री प्रकाश गायकवाड यांचे मार्गदर्शना खाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मुरलीधर करपे यांचे सुचने नुसार पोलीस शिपाई स्मित चव्हाण, पोलीस शिपाई रुपनर, यांनी केली आहे.